**ठळक बातम्या**

- रोज नव्यानं उद्भवणाऱ्या आव्हानांवर तोडगा शोधण्याची गुणवत्ता आणि क्षमता भारतीय तरुणांकडे असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, तामिळनाडूत १३ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचा केला प्रारंभ

- कॉक्रोच जनता पार्टीच्या नेत्यांची एक वर्ष शांतता राखण्याच्या अटीवर सुटका

- शारदीय नवरात्रौत्सवाला भक्तीमय वातावरणात प्रारंभ/ राज्यात साडेतीन शक्तिपीठांच्या मंदिरांसह सर्वत्र विधिवत घटस्थापना

**आणि**

- आयएसएसएफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या उदयवीर सिधूची १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी

**<><><><><>**

भारतीय युवा वर्गाकडे जगात रोज नव्यानं उद्भवणाऱ्या आव्हानांवर तोडगा शोधण्याची गुणवत्ता आणि क्षमता क्षमता असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज चेन्नई मध्ये 'जयगोपाल गरोडिया हिंदू विद्यालया'च्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात बोलत होते. 'विकसित भारत'चं स्वप्न साकारण्यात युवा पिढी महत्त्वाची भूमिका बजावेल, असं ते यावेळी म्हणाले. भारतामध्ये तरुणांसाठी प्रचंड संधी उपलब्ध असून, तरुणांनी आपली क्षमता ओळखून देशाच्या विकासात योगदान द्यावं असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आयआयटी चेन्नई इथं १३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकासकामांचं लोकार्पण आणि पायाभरणी केली. रस्ते आणि रेल्वे वाहतूक, बंदरं, पेट्रोलियम आणि वैज्ञानिक संशोधन अशा प्रकल्पांचा यात समावेश आहे. या प्रकल्पांमुळे जोडणी वाढेल, उद्योग आणि व्यापाराला चालना मिळेल, राज्यातल्या युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हे प्रकल्प तमिळनाडूच्या नागरिकांचं रोजचं आयुष्य सोपं करतील आणि राज्याच्या आर्थिक विकासाला हातभार

लावतील, असंही ते म्हणाले. तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातल्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत देताना आवश्यकतेनुसार निकषांच्या पलीकडे जाऊन निर्णय घेतले जातील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक इथं ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्या समृद्ध पंचायतराज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ करताना बोलत होते. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सरकार शक्य ती सर्व मदत करेल, अन्न धान्य पुरवठ्याची विशेष काळजी घेतली जाईल, शेतकऱ्यांपर्यंत विविध शासकीय योजनांचे लाभ पोहोचवले जातील, जी राम जी योजनेच्या माध्यमातून रोजागाराच्या संधी निर्माण केल्या जातील असं त्यांनी सांगितलं. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी आपलं पशुधन विकू नये असं आवाहन त्यांनी केलं. पशुधनाच्या चारा पाण्यासाठी राज्य सरकार शक्य ती सर्व मदत करेल असं ते म्हणाले.

**- - होल्ड बाईट - - - -**

आज सुरू केलेल्या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात गावागावांत जलसंधारणाची कामं हाती घ्यावीत असं आवाहनही त्यांनी केलं. दुष्काळावर मात करण्यासाठी जलसमृद्ध गावं विकसित करणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या अभियानाचा हा दुसरा टप्पा ११ ऑक्टोबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबवलं जाणार आहे.

या कार्यक्रमादरम्यान समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांना पुरस्कार देऊन सन्मानितही केलं गेलं.

**<><><><><>**

राज्यातल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर रोजगारनिर्मिती, गरजूंपर्यंत अन्नधान्य पोहोचवणं, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पशुधनासाठी चारा-पाणी उपलब्ध करून देण्याचं सूक्ष्म नियोजन राज्य सरकार करत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाला दिली. या पथकाबरोबर आज झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातल्या नागरिकांना पुढचे ६ ते ८ महिने जास्त आधार देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. या पथकाच्या

संवेदनशील पाहणीमुळे दुष्काळाची तीव्रता केंद्र सरकारपर्यंत पोहोचायला मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मान्सूनच्या पहिल्या २ महिन्यांत चांगला पाऊस झाल्यानं यंदा विक्रमी उत्पादनाची अपेक्षा होती, पण पिकं फुलोऱ्याच्या अवस्थेत असतानाच पावसात सुमारे २ महिने खंड पडला, त्यामुळे सोयाबीन पिकाला सर्वाधिक फटका बसला, तसंच कापूस, तूर, ऊस या पिकांवरही परिणाम झाल्याचं फडनवीस म्हणाले. पाण्याअभावी रब्बीची पेरणी होण्याची शक्यताही कमी असून खरीप हंगामातलं नुकसानही भरून काढता येणार नाही. त्यामुळे रोजगार आणि अन्नसुरक्षेच्या योजनांच्या माध्यमातून नियोजन करून मदत दिली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य, जलस्त्रोतांचं पुनरुज्जीवन, पशुधनासाठी चारा-पाण्याचं नियोजन याला सरकारचं प्राधान्य असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

दिल्ली विमानतळावर ताब्यात घेतलेले कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजित दिपके, आशुतोष रांका आणि सौरव दास यांना कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर आज हजर केल्यानंतर एका वर्षासाठी शांततेचा भंग न करण्याच्या अटीवर त्यांची सुटका करण्यात आली. सुटका झाल्यावर त्यांनी दिल्लीत वार्ताहर परिषद घेतली. निवडणुकीत भाजपाला फायदा मिळावा म्हणून निवडणूक आयोग प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या इशाऱ्यावर काम करत आहे, असा आरोप त्यांनी यावेळी केला. पुन्हा आंदोलन करणार नाही, अशा अर्थाचं कोणतंही हमीपत्र आपण दिलेलं नाही, असं कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी नागपूर विमानतळावर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

<><><><><>

कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ मुंबईच्या शिवाजी पार्कमध्ये आंदोलन करण्यासाठी आलेल्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्यासह अनेकांना पोलिसांनी परिसरातून ताब्यात घेतलं. परवानगी न घेता शिवाजी पार्कमध्ये आंदोलनासाठी जमलेल्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या परिसरात कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कालही पोलिसांनी मुंबईत विविध ठिकाणांवरून सुमारे ६०० जणांना ताब्यात घेतलं होतं.

<><><><><>

शारदीय नवरात्रौत्सव आजपासून सुरु झाला. राज्यातल्या देवीच्या मंदिरांमध्ये भक्तीमय वातावरणात घटस्थापनेचा सोहळा पार पडला. **मुंबईत** मुंबादेवी, काळबादेवी, ग्रामदेवी, महालक्ष्मी, शितला देवी, प्रभादेवी या देवीच्या मंदिरांमध्ये घटस्थापना झाली. अनेक ठिकाणी नवरात्रीनिमित्त दांडिया रास, गरबा, आणि रामलीला कार्यक्रमांचंही आयोजन केलं आहे.

राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जनतेला नवरात्रौत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**करवीर** निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई मंदिरात आज परंपरेप्रमाणे घटस्थापना विधी संपन्न झाला. मानाच्या तोफेची सलामी देऊन शारदीय नवरात्रौत्सवाची सुरुवात झाली. आज पहिल्या दिवशी देवीची 'नंदादेवी'च्या रुपात बैठी पूजा बांधण्यात आली होती

**तुळजापूरच्या** तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवाची सुरुवात आज विधिवत घटस्थापनेनं झाली. कल्लोळतीर्थापासून डोक्यावर पाण्याने भरलेले मातीचे घट घेऊन मिरवणूक काढण्यात आली.

**नांदेड** जिल्हयातल्या माहूर गडावर रेणुका मातेच्या नवरात्रौत्सवाला सुरूवात झाली. संपूर्ण परिसरात फुलांची सजावट केली होती.

**नाशिक** जिल्ह्यात सप्तश्रृंग गडावर आज दिवसभरात ७५ हजार भाविकांनी आदिमाया सप्तश्रृंगी मातेचं दर्शन घेतल्याची माहिती देवस्थानच्या सूत्रांनी दिली.

**<><><><><>**

इजिप्तमध्ये सुरू असलेल्या आयएसएसएफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या उदयवीर सिधू यानं पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदकावर नाव कोरलं आहे. थरारक अंतिम सामन्यात त्यानं २४० पूर्णांक ६ गुणांची कमाई केली आणि केवळ अर्ध्या गुणाच्या फरकानं सुवर्णपदक पटकावलं.

**<><><><><>**

दिल्लीत कायदा आणि सुव्यवस्थेची सद्यस्थिती लक्षात घेऊन मेट्रो आणि रेल्वे सेवा सुरू करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तसंच, या परिसरात इंटरनेट सेवा अखंडित राहतील, याची खात्री करण्याचे निर्देशही न्यायालयानं केंद्र सरकारला दिले. आपल्या निर्देशांचे कथित उल्लंघन केल्याप्रकरणी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई सुरू करण्याची

मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली. या प्रकरणात सर्व बाजूंचं म्हणणं ऐकून घेतलं जाईल आणि कोणाचीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. शांततापूर्ण मार्गाने एकत्र जमणाऱ्यांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलं जाणार नाही, तसंच वाहतुकीच्या नियमांचं पालन करून फिरण्याची मोकळीक राहील, असंही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केलं.

<><><><><>

दिल्लीतल्या कालच्या आंदोलनादरम्यान मेट्रो आणि रेल्वे सेवांवरच्या निर्बंधांबाबत सर्वोच्च न्यायालयानं ९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निर्देशांचं उल्लंघन झाल्यामुळे प्रथमदर्शनी न्यायालयाचा अवमान झाल्याचं दिसून येत आहे, असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. ॲडव्होकेट शैलेंद्र मणी त्रिपाठी यांनी दाखल केलेल्या अवमान याचिकेवर न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठानं आज विशेष सुनावणी घेतली. यानंतर काढलेल्या लेखी आदेशात प्रथमदर्शनी न्यायालयाचा अवमान झाल्याचं निरीक्षण त्यांनी नोंदवलं आहे. केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन, दिल्लीचे पोलीस आयुक्त अनुराग कुमार आणि दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळाच्या अध्यक्ष डी. तारा यांना न्यायालयानं नोटिसा बजावल्या. या तिघांनी १३ ऑक्टोबरपर्यंत या प्रकरणी शपथपत्र दाखल करावं, तसंच न्यायालयाच्या ९ ऑक्टोबरच्या निर्देशांच्या पालनाबाबत अहवाल सादर करावा, असंही न्यायालयानं आज सांगितलं. पुढची सुनावणी १३ ऑक्टोबरला होणार आहे.

<><><><><>

गुजरातमध्ये आज नगरपालिका, नगरपंचायती आणि पंचायत समित्यांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक आणि पोटनिवडणुका शांततेत पडल्या. गांधीनगर महानगरपालिकेतल्या ११ प्रभागांसाठी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सरासरी ५५ टक्के, थरा नगरपालिकेतल्या ६ प्रभागांसाठी ७९ टक्के, तर ओखा नगरपालिकेच्या ९ प्रभागांसाठी ५६ पूर्णांक ४४ टक्के मतदान झाल्याची माहिती गुजरात राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे.

यासोबतच खेराळू, छोटा उदेपूर आणि बायड नगरपालिकेत काही जागांसाठी पोटनिवडणुका झाल्या, तर देवभूमी द्वारका जिल्हा पंचायत, पाधडी तालुका पंचायत, सतलासाना आणि हारीज तालुका पंचायतींसाठीही आज मतदान झाले.

<><><><><>

जलजीवन मिशन अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातल्या ३ गावांमध्ये गावातल्या नळपाणी पुरवठा योजनेचं संचालन, देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी महिला बचत गट आणि ग्रामसंघांकडे देण्यात आली आहे. देशातला हा अशा प्रकारचा पहिलाच प्रयोग आहे. तो यशस्वी झाल्याची माहिती रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिली.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातला तिसरा टी ट्वेंटी क्रिकेट सामना आज इंदौर इथं सुरु आहे. वेस्ट इंडिजनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.
शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १४ षटकात ५ बाद  १६८ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//